संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निष्ठेच्या अनुष्ठानातून सत्संगाचे अनुपान

**समाजातली** सत्प्रवृत्ती टिकायची असेल तर सत्संगाची नितांत आवश्यकता आहे. सत्संग म्हणजे काय? तर सतत केली जाणारी ईश्वरी शक्तीची आराधना आणि हे करणारे जे जे काही उपक्रम असतील किंवा व्यक्ती प्रवृत्ती असतील त्या सर्वांना सत्संग म्हटले जाते. विविध ठिकाणी होणारे कीर्तनाचे, भजनाचे, प्रवचनाचे किंवा नामस्मरणाचे उपक्रम हे सगळे उपक्रम एक सत्संगाचाच प्रकार ठरतो. संत तुकोबांनी 'संत संग देई सदा' अशी मागणी करून आपली ईश्वरनिष्ठा कायम राहील अशीच इच्छा व्यक्त केली होती. ज्यामध्ये 'सत्' या शब्दाचा उच्चार आहे तिथे चांगलेपणाचा उद्गार असल्याचे आपण अनुभवू शकतो. हजारो वर्षापासून या सत्संगाची फलश्रुती समाज अनुभवत आलेला आहे. म्हणून आजही आजच्या या विज्ञान-तंत्रज्ञान युगातसुध्दा या सत्संगाची ओढ दिसून येते. अर्थात ती सगळ्यांमध्येच असते असे नाही. किंबहुना ती अधिकाधिक लोकांमध्ये निर्माण व्हावी. विशेषतः आजच्या माहिती तंत्रज्ञान युगामध्ये ती रुजावी या हेतूने अनेकानेक उपक्रम होतात. पाच दिवस सज्जनगडाचे मकरंदबुवा रामदासी यांच्या प्रवचनाचा लाभ श्रोत्यांना प्राप्त करून दिला गेला. श्रीमद्भागवतामध्ये वक्ता, श्रोता कसा असावा याची उदाहरणे वाचायला मिळतात. वक्ता ज्याप्रमाणे ज्ञानी आणि सद्गुण संपन्न असावा त्याप्रमाणे श्रोतादेखील तितकाच अधिकारी असावा, असे वर्णन त्यात केले गेले आहे. वयाच्या पन्नाशीतच देशविदेशात पाच हजारांपेक्षा जास्त कीर्तन, प्रवचन किंवा श्रीमद्भागवताचे उपक्रम करण्याचा उच्चांक मकरंद बुवांच्या नावी जमा आहे. स्वतः मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे आणि पायलटचे शिक्षण घेतलेल्या मकरंद बुवांनी सुरुवातीची बारा वर्षे सज्जनगडावर शास्त्रशुध्द अध्ययन केले. वेदान्त परिचय करून घेतला. कीर्तनकला अवगत केली आणि आजच्या तरूणाईला समजेल असे किंवा समाजातल्या विज्ञानवादी दृष्टीकोनाला समोर ठेवून अध्यात्म आणि या सृष्टीतील ईशतत्त्वाचे विवरण त्यांच्या प्रवचनामधून ऐकवले जाते. आज नेमक्या अशाच उपक्रमाची गरजही वाटू लागते.

### भक्तीचा छंद

सत्संगाची आवश्यकता का? तर जसे सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे समाजातल्या सत्प्रवृत्तींच्या जागरणासाठी आहे. म्हणजेच दुष्प्रवृत्तींच्या विनाशाची तितकीच गरज आहे. या दुष्प्रवृत्ती अज्ञानामुळे निर्माण होतात, असे भगवद्गीता सांगते. भगवद्गीतेमध्ये 'ज्ञानाग्नि सर्वकर्माणि भस्मसात् कुरुतेर्जुन' असे म्हटले आहे. माणसाचे सगळे दुःख अज्ञानात आहे. हे अज्ञान जाळण्याचे काम अग्नी करीत असतो. तोच ज्ञानाग्नी सत्संगांमधून कथाकीर्तनातून तेवत ठेवला जातो. भारतीय संस्कृतीने यासाठीच भक्तीयोगाची महती गाईली आहे. माणूस किती जरी मोठा झाला तरी तो सान्त म्हणजेच त्याला वेदान्तामध्ये परिच्छिन्न म्हटले गेले आहे. त्याला सर्वच प्रकारच्या मर्यादा आहेत आणि अशा सान्त मनुष्याला अनंताला गवसणी घालण्याचे आवाहन भारतीय संस्कृती करते. म्हणजेच तत्त्वज्ञानाच्या भाषेत हे ब्रह्म जाणून घेण्याची प्रेरणा त्याच्यामध्ये निर्माण व्हावी. हा त्यामागचा उद्देशही दिसून येतो. परंतु याकरिता भक्ती किंवा अध्यात्माचाच आधार घ्यावा लागतो. ज्यामधून खऱ्या अर्थाने ज्ञानसाधनाही होते. महाराष्ट्रातील संत महंतांनी या सत्संगासाठी सतत सत्पुरुषांच्या सहवासात राहण्याची मागणी केली होती. कारण अशा सत्पुरुषांमध्ये किंवा सत्संगांमध्ये जाऊन एक वेगळीच विद्या शिकता येते ती म्हणजे स्वतःतला मीपणा मारून पुन्हा मीपणाने राहायचे असते. आणि ती विद्या म्हणजेच मी देह आहे. हे अज्ञान त्याला नाहीसे करायचे असते. हे काम जर अशा सत्संगातून होते. म्हणूनच त्याचे महत्त्व आजपर्यंत टिकून आहे. गेले पाच दिवस सुरु असलेल्या श्रीकृष्ण कथेच्या उपक्रमात श्रीकृष्णाची विविध रुपे मकरंद बुवा यांनी सांगितलीच. परंतु सतत भगवंताशी संलग्न राहिल्याने आपण काही काळ आपल्यापासून वेगळे होण्याचा अनुभव घेता येऊ शकतो याचे मर्मही त्यांनी सांगितले. आणि हे खरेच आहे की वेदान्तापासून ते आजच्या पंढरीच्या वारीपर्यंत सत्संगाचा महिमा सिध्द झाला आहे. सत्संगतीने तुटती कुबुध्दी हेदेखील अनुभवाला आलेले आहे. त्यासाठी लोकांमध्ये भक्तीचा छंद निर्माण करण्याचा प्रयत्न जर आजचे हे मकरंदबुवा आपल्या तरूण वयामध्ये भक्ती आणि ज्ञानसाधनेने करीत असतील तर त्याचा निश्चितच समाजाला उपयोग होऊ शकतो.

### कृष्ण चरित्राचे अधिष्ठान

स्वतःच्या नावापुढे रामदासी असे बिरूद लावत असताना समर्थ वाङ्मयाचा समर्थ अभ्यास हे तर बुवांचे वैशिष्ट्य आहेच. परंतु सज्जनगडासारख्या ठिकाणी त्यांनी त्यांच्या या भक्तीप्रसाराच्या किंवा प्रबोधन चळवळीचे अधिष्ठान प्राप्त करून घेतले. त्यांना मिळालेला हा वरदहस्त आणि गुरूंचे मार्गदर्शन त्याला कारणीभूत आहेच. परंतु वक्तृत्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण शैली आणि गायनाची कला या माध्यमातून श्रोत्यांवर भक्तीसंस्कार नेमकेपणाने बिंबवण्याचे कार्यही त्यांच्याकडून साधले जाते. आजच्या काळात घरोघरी चोवीस तास सुरु राहाणाऱ्या टीव्ही सिरियल्स, चित्रपट किंवा मोबाईलमधल्या व्हॉटस् अप, फेसबुकमुळे लोकांचा विशेषतः तरुणाईचे या प्राचीन संस्कृतीकडे दुर्लक्ष होते. त्याचे अनिष्ट परिणामही घराघरातून पाहायला मिळतात. अशाच भक्तीचे जागरण व्हावे आणि ईश्वरनिष्ठेच्या अनुष्ठानाचे अनुपान होत राहावे हा उद्देश ठेवून धर्मजागरण मंडळाचा श्रीकृष्ण कथेचा उपक्रम सत्कारणी लागला. पुढच्या महिन्याभरात पंढरीच्या वारीचे वेध लोकांना लागतील. त्यावेळेला संपूर्ण महाराष्ट्रभर अशाच सत्संगाचे महत्त्व वारंवार सांगण्याचा प्रयत्न होतो. व्यक्ती आणि समाजाला प्रेरणा देण्याचे उद्देश त्यातून साधले जातात. अर्थातच या प्रेरणेतून व्यक्तीगत स्तरावर नामस्मरण किंवा सत्प्रवृत्तींचे अनुकरण सतत घडावे हेही तितकेच महत्वाचे असते. तत्त्ववेत्त्यांनी मनुष्य हा जर समाजप्रिय प्राणी आहे असे म्हटले असेल तर त्या समाजातलीच सद्गुण संपन्नता वाढवण्याचे दायित्वसुध्दा याच समाजातल्या विवेकी वर्गाला करावे लागेल.